N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)
प्रथम खबर अहवाल
(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** अमरावती ग्रामीण
**P.S.(ठाणे):** दत्तापूर
**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0048
**Year (वर्ष):** 2025
**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 06/03/2025 02:48

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 8 |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 12 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**
   1. **Day(दिवस):** बुधवार
      **Date From (दिनांक पासून):** 05/03/2025
      **Time Period (कालावधी):** पहर 6
      **Date To ( दिनांक पर्यंत):** 05/03/2025
      **Time From (वेळेपासून):** 17:24 बजे
      **Time To (वेळेपर्यंत):** 17:31 बजे

   (b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
   **Date (दिनांक ):** 06/03/2025 **Time (वेळ):** 02:10 बजे

   (c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
   **Entry No. (नोंद क्र.):** 003
   **Date & Time (दिनांक आणि वेळ):** 06/03/2025 02:31 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी
5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**
   1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
   उत्तर, 4 किमी **Beat No. (बिट क्र.):**
   (b) **Address (पत्ता):** अरिहंतनगर परसोडी ग्रामपंचायत ,धामणगांव रेल्वे

   (c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
   **Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
   **District(State) (जिल्हा(राज्य)):**

संतोष व [illegible]
पोलीस निरीक्षक
अँन्टी करप्शन ब्युरो,अमरावती.

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** श्री.दुर्गाबक्षसिंह उर्फ बच्च रामप्रतापसिंह ठाकुर

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1959

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | ग्रापं हिंगणगाव का,धामणगाव रेल्वे ,दत्तापूर,अमरावती ग्रामीण,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | ग्रापं हिंगणगाव का,धामणगाव रेल्वे ,दत्तापूर,अमरावती ग्रामीण,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):** 91-9421737775

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | श्री.मनिष नरेंद्रराव श्रीखंडे | | | 1. रा घर नं 54 केदारेश्वर मंदीर , रोड केदार चौक वरूड, , दत्तापूर,अमरावती ग्रामीण, महाराष्ट्र,भारत |
| 2 | श्री.सुदेश भरत मेंघाणी | | | 1. यशवंत बाबा कलनी, , अमरावती रोड वरूड,दत्तापूर, अमरावती ग्रामीण,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|

**10 Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

**11.Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

**12.First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**
फिर्याद

दि.06/03/2025.

माझे नाव:- श्री.दुर्गबक्षसिंह उर्फ (बच्चु) रामप्रतापसिंह ठाकुर, वय-65 वर्ष, पद- सरपंच, ग्रा.पं. हिंगणगाव (का.) ता.धामणगाव रेल्वे जि.अमरावती रा.ह.मु. नुतन चौक, धामणगाव रेल्वे ता.धामणगाव रेल्वे जि.अमरावती मो- 9421737775.
मी अॅन्टी करप्शन ब्युरो अमरावती येथे हजर राहुन लेखी तक्रार देतो की, मी वर नमुद पत्त्यावर माझे कुटुंबासह राहतो. माझा शेतीचा व्यवसाय असुन त्यातुन मिळणाऱ्या उत्पन्नातुन माझ्या कुटुंबाचा उदनिर्वाह चालतो. मागील वीस वर्षापासुन मी राजकारणात सक्रीय असुन सध्या सन 2021 पासुन मी ग्रामपंचायत, हिंगणगाव (का.) ता.धामणगाव रेल्वे जि.अमरावती येथे सरपंच या पदावर कार्यरत आहे. ग्रामपंचायत अंतर्गत शासनाच्या विविध योजना मार्फत तसेच विभागा मार्फत होणाऱ्या विकास कामावर सरपंच या नात्याने देखरेख करणे व काम नियमीत होत आहे किंवा नाही यावर लक्ष ठेवणे हे माझे कर्तव्य आहे. तसेच ग्राम पंचायतीच्या हद्दीतील शासनाच्या वतीने केलेले काम व्यवस्थित झाल्याचे प्रमाणपत्र काम पुर्ण झाल्यावर सरपंच यांचेकडुन जिल्हा परिषद बांधकाम विभाग यांना द्यावे लागते. डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक विकास योजनेअंर्तगत मौजे हिंगणगाव येथील राहुल खाडे ते मारवे यांच्या घरा पर्यंतचा रस्ता तयार करण्याचे काम श्री.मनिष नरेंद्रराव श्रीखंडे यांना कार्यरंभ आदेशानुसार दि.28/11/2024 रोजी कार्यकारी अभियंता, बांधकाम विभाग, जिल्हा परिषद, अमरावती यांच्या कडुन कामाचे अंदाजपत्रकीय किंमत 8,40,471/-रु. इतक्या रक्कमेचे काम मिळाले आहे. कार्यरंभ आदेश नुसार कंत्राटदार श्री.मनिष श्रीखंडे यांनी मागील पंधरा दिवसा पुर्वी रस्ता तयार करण्याचे काम सुरू केले आहे. परंतु अंदाज पत्रकात नमुद केलेल्या नियमानुसार कंत्राटदार श्री.मनिष श्रीखंडे यांनी रस्त्याचे खोदकाम त्यात 80mm आकाराचे गोटे व मुरूम टाकुन दबाई करणे आवश्यक होते. परंतु ठेकेदार यांनी तसे न करता रत्याचे कमी प्रमाणात खोदकाम करून कमी आकाराचे गोटे टाकुन नियमाप्रमाणे काम न करता निकृष्ट दर्जाचे काम करीत आहे. त्यामुळे मी संबंधीत ठेकेदार श्री.मनिश श्रीखंडे यांना तुमचे काम हे निकृष्ट दर्जाचे करीत असुन तुम्ही केलेल्या कामाची मी तक्रार करणार आहे असे सांगितले. त्यानंतर दि.25/02/2025 रोजी मला ठेकेदार श्री.मनिष श्रीखंडे व त्यांचे मित्र श्री.सुदेश मेंघाणी यांचे मोबाईल क्र.8208527955 वरून माझ्या मोबाईल नंबरवर फोन करून धामणगाव येथे भेटण्यासाठी आले. व मला श्री.मनिष श्रीखंडे म्हणाले की, मी केलेल्या रस्त्याच्या कामाची तक्रार करू नका असे बोलले व मिळालेल्या कामाच्या रक्कमेच्या दोन टक्के रक्कम म्हणुन मला त्यांच्या जवळील 20,000/-रु. देण्याचा प्रयत्न केला. परंतु मी ते पैसे घेतले नाहीत व त्याला बोललो की, माझी आता तब्येत ठिक नाही काय असेल ते नंतर पाहु असे बोललो. त्यानंतर श्री.मनिष श्रीखंडे व त्याचा मित्र हे तेथुन निघुन गेले. त्यानंतर मी संबधीत ठेकेदार यांनी रस्त्याच्या निकृष्ट दर्जाच्या केलेल्या कामाची चौकशी करण्यासाठी मा.उपविभागीय अभियता, चांदुर रेल्वे जिल्हा परिषद बांधकाम विभाग, अमरावती तसेच मा.कार्यकारी अभियता, जिल्हा परिषद, बांधकाम विभाग, अमरावती यांच्याकडे दि. 27/02/2025 रोजी तक्रार केली आहे. त्यानंतर दि.27/02/2025 रोजी ठेकेदार श्री.मनिष श्रीखंडे यांचे सहकारी श्री.सुदेश मेंघाणी यांचे मो.क्र.8208527955 वरून माझ्या नंबरवर फोन करून ठेकेदार श्री.मनिष श्रीखंडे व त्यांचे सहकारी श्री. सुदेश मेंघाणी हे मी केलेली तक्रार मिटवण्यासाठी भेटायला येवु का असे म्हणत आहे. मी सरपंच यापदावर एक लोकसेवक असुन सदर इसमास मी कोणत्याही प्रकारची लाच किंवा पैसे न मागताही त्यांनी



संतोष [illegible]
पोलीस निरीक्षक
ॲन्टी करप्शन ब्युरो, अमरावती

मला निकृष्ट दर्जाचे काम करून देण्यासाठी पैशाचे आमीश दिले आहे. मला सदरची रक्कम स्विकारावयाची नाही व कोणतेही निकृष्ट दर्जाचे काम माझे ग्रामपंचायत मध्ये करून देणार नाही.

ठेकेदार श्री.मनिष श्रीखंडे यांनी रस्त्याचे निकृष्ट दर्जाचे काम करीत असल्याने गावकरी यांचा रोष आहे. म्हणुन त्यांचे विरूध्द जिल्हा परिषद बाधंकाम विभाग येथे दिलेली तक्रार माघारी घ्याची नाही. तसेच ठेकेदार श्री.मनिष श्रीखंडे यांनी रस्त्याचे काम व्यवस्थित झाल्याचे प्रमाणपत्र काम पुर्ण झाल्यावर जिल्हा परिषद बांधकाम विभागास दयावे व केलेल्या कामाचे प्रमाणपत्र देण्यासाठी अडवणूक करू नये तसेच सुरू असलेल्या धामणगाव येथील कामाच्या तक्रारी बांधकाम विभागाकडे करू नये त्याकरिता ठेकेदार लाच देत आहे. ठेकेदार मला लाच म्हणुन देत असलेली रक्कम 20,000/- रु. घेण्याची आजीबात माझी ईच्छा नाही. तसेच माझा त्यांच्यासोबत व्यक्तीगत कुठलाही आर्थिक देण्याघेण्याचा व्यवहार नाही किंवा कुठलेही भांडण नाही. त्यासंबंधाने आज रोजी मी आपले कार्यालयात येवून तक्रार देत आहे. तरी त्यांचेवर अॅन्टी करप्शनची कायदेशिर कारवाई व्हावी अशा आशयाची सविस्तर स्वहस्ताक्षरात लेखी तक्रार दिली होती.

माझे तक्रारीची पडताळणी करण्याकरीता दि.03/03/2025 रोजी पोलिस निरिक्षक श्री.संतोष तागड यांनी विभागीय उपआयुक्त, महीला व बाल विकास, अमरावती कार्यालय येथुन श्री.विलास काळे,पद - विधी सल्लागार व श्री.हरिभाउ वाघ,पद - कनिष्ठ लिपीक असे दोन शासकीय पंच पत्र देउन बोलावुन घेतले. त्यानंतर पो.नि.संतोष तागड यांनी दोन्ही पंचाना माझा व कार्यालयातील स्टाफचा परिचय करून दिला तसेच पंचाना त्यांचा परिचय देण्यास सांगुन मी माझी थोडक्यात तोंडी तक्रार सांगुन मी दिलेली लेखी तक्रार पंचाना वाचण्यास दिली. त्यांनतर पंचानी ती वाचुन पाहीली व मी तोंडी सांगितलेली तक्रार व दिलेली लेखी तक्रार एकच असल्याची खात्री झाल्याने पंचानी माझे लेखी तक्रारीवर शेरा लिहून सहया केल्या त्यावेळी मला ठेकेदार श्री.मनिष श्रीखंडे व त्याचा सहकारी श्री. सुदेश मेंघाणी यांची खरोखरच लाच देणार आहेत काय? याची पडताळणी करणे आवश्यक असल्याचे सांगुन दोन्ही पंचास व मला डिजिटल व्हाईस रेकॉर्डर बद्दल माहीती सांगुन त्याची कार्यपध्दती सांगितली व प्रात्यक्षीक करुन दाखविले. त्यानंतर मी माझे मोबाईल फोनवरुन ठेकेदार श्री.मनिष श्रीखंडे यांचे मित्र श्री.सुदेश मेंघाणी यांचे मोबाईल क्र. 8208527955 वर कॉल केला असता, त्यांनी मला ते बाहेरगावी कामाकरीता असल्याचे सांगुन दि. 05/03/2025 रोजी धामणगाव रेल्वे येथे भेटण्यास येतो असे सांगीतले, वरुन दिनांक 05/03/2025 रोजी पडताळणी कार्यवाही धामणगाव येथे करण्याचे ठरविण्यात आले. त्यावेळी पो.नि.संतोष तागड यांनी सविस्तर पडताळणी पुर्व पंचनामा केला आहे.

त्यांनतर दि.05/03/2025 रोजी ठेकेदार श्री.मनिष श्रीखंडे व त्यांचे मित्र श्री.सुदेश मेंघाणी हे भेटीसाठी येणार असल्याची खात्री झाल्याने पो.नि.तागड हे पंच संपुर्ण स्टाफ कार्यवाही करीता लागणारे साहीत्यासह शासकीय वाहनाने धामणगाव या गावी आले त्यानंतर गांधी चौकात मोकळ्या ठिकाणी थांबुन त्यावेळी मला फोनवर संपर्क करुन मला त्याठिकाणी बोलाविले. मी त्याठिकाणी गेल्यानतंर मला व दोंन्ही पंचाना पडताळणी पुर्व पंचनाम्यातील सुचनांची उजळणी करुन दिली. पडताळणी कार्यवाही दरम्यान पंचासमक्ष पोलीस अंमलदार शैलेश कडु यांनी डिजीटल व्हाईस रेकॉर्डर मध्ये नविन मेमरी कार्ड टाकून व्हाईस रेकॉर्डर सुरु करुन माझे गळयामध्ये कोणालाही दिसणार नाही अशा पध्दतीने धाग्याच्या सहायाने बांधून शर्टाच्या आतमध्ये गळयात टाकले. त्यानंतर मी व पंच क्र.1 श्री.काळे यांचे सह माझे मुलाचे महेश अॅटो मोबाईल्स शोरुम परसोडी रोड येथे रवाना केले असता, त्यावेळी माझी ठेकेदार श्री.मनिष श्रीखंडे व त्यांचे मित्र श्री.सुदेश मेंघाणी यांची भेट झाली असता, भेटी दरम्यान मी श्री.मनिष श्रीखंडे यांचे विरुध्द जिल्हा परिषद बाधंकाम विभाग येथे दिलेली तक्रार माघारी घ्यावी, तसेच त्यांनी रस्त्याचे काम व्यवस्थित झाल्याचे प्रमाणपत्र काम पुर्ण झाल्यावर जिल्हा परिषद बांधकाम विभागास दयावे व केलेल्या कामाचे प्रमाणपत्र देण्यासाठी अडवणूक करू नये तसेच सुरू असलेल्या धामनगाव येथील कामाच्या तक्रारी बांधकाम विभागाकडे करु नये, त्याकरिता ठेकेदार श्री.श्रीखंडे यांनी मला पंचासमक्ष मला एकुण मिळालेल्या कामाच्या रक्कमेच्या 02 टक्के प्रमाणे 20,000/- रुपये लाच देण्याचे आमिश दिले तसेच त्यांचे मित्र श्री.सुदेश मेंघाणी यांनी मला लाच रक्कम घेण्यासाठी प्रोत्साहन दिले व लाच रक्कम हि मौजे हिंगणगाव येथील ठेकेदार श्री.मनिष श्रीखंडे यांचे काम सुरु असलेल्या ठिकाणी रस्त्यावर देणार असल्याचे निष्पन्न झाले वरुन पो.नि.संतोष तागड यांनी लागलीच सापळा कार्यवाही आयोजीत करण्याचे ठरविले. त्यानंतर तागड साहेबांनी मला सापळापुर्व कार्यवाहीचा आवश्यक सुचना दिल्या व ठेकेदार श्री.श्रीखंडे यांनी लाच रक्कम दिल्यानंतर नियोजित इशारा करावा असे सांगीतले. त्यानंतर पोलीस अंमलदार शैलेश कडु यांनी तागड साहेब यांचे सुचनेवरुन डिजीटल व्हाईस रेकॉर्डर सुरु करुन माझे सोबत पंच क्र.1 श्री.काळे यांना अरिहंत नगर, परसोडी ग्रामपंचायत हिंगणगाव येथे रवाना केले ती वेळ अंदाजे 17.24 वा. ची होती. व आमचे पाठोपाठ पो.नि.तागड साहेब व त्यांचे सापळा पथक हे त्याठिकाणी येवून इतस्त्र दबा धरुन थांबले. मी व पंच क्र.1 श्री.काळे असे अरिहंत नगर, परसोडी ग्रामपंचायत हिंगणगाव येथे ठेकेदार श्री.मनिष श्रीखंडे

यांचे काम सुरु असलेल्या ठिकाणी पोहचलो त्याठिकाणी माझी ठेकेदार श्री.मनिष श्रीखंडे व त्यांचे मित्र श्री.सुदेश मेंघाणी यांची भेट झाली असता, कामासंबंधाने चर्चा झाली. त्यानंतर ठेकेदार श्री.श्रीखंडे त्यांचे जवळील 20,000/- रुपये लाच रक्कम पंचासमक्ष मला दिली, त्यावेळी मी सापळा पथकास लाच रक्कम घेतल्याबाबतचा नियोजित इशारा केला. त्यावेळी पो.नि.संतोष तागड व पो.नि.केतन मांजरे तसेच सापळा पथकातील अमंलदार व पंच क्र.2 वाघ असे सर्वजण त्याठिकाणी आले. ठेकेदार श्री.मनिष श्रीखंडे व त्यांचे मित्र श्री.सुदेश मेंघाणी यांना ताब्यात घेतले. त्यानंतर पोलीस अंमलदार शैलेश कडु यांनी माझे जवळ असलेले व्हाईस रेकॉर्डर बंद केला ती वेळ 17.31 वा. ची होती. त्यानंतर पो.नि.तागड यांनी ठेकेदार श्री.मनिष श्रीखंडे व त्यांचे मित्र श्री.सुदेश मेंघाणी यांना त्यांचा, पंचाचा व सापळा पथकातील अधिकारी व अंमलदार यांचा परिचय करुन दिला. त्यानंतर ठेकेदार श्री.श्रीखंडे यांना पो.नि. तागड यांनी त्यांचा परिचय विचारला असता, त्यांनी सांगीतले की, श्री.मनिष नरेंद्रराव श्रीखंडे, वय 29 वर्षे, व्यवसाय - शासकिय कंत्राटदार, रा. घर नं. 54 केदारेश्वर मंदीर रोड, केदार चौक वरूड, जि. अमरावती तसेच श्री.मेंघाणी यांना त्यांचा परिचय विचारला असता, त्यांनी सांगीतले की, श्री.सुदेश भरत मेंघाणी, वय 32 वर्षे, व्यवसाय - शासकिय कंत्राटदार, रा. यशवंत बाबा कॉलनी, अमरावती रोड वरूड असे सांगीतले. त्यानंतर माझे कडे श्री.श्रीखंडे यांनी दिलेले 20,000/- रुपये लाच रक्कम ज्यात 500/- रुपये दराच्या 40 नोटा अशा पंच क्र.2 श्री.वाघ यांचेकडून खात्री करुन ताब्यात घेतल्या. त्याठिकाणी लोकांची गर्दी होत असल्याने पुढील कार्यवाही करण्याकरीता शासकीय वाहनाने शासकीय विश्रामगृह, धामणगाव रेल्वे येथे आलो. त्यानंतर पो.नि.तागड यांनी केलेल्या संपुर्ण कार्यवाहीचा सविस्तर पंचनामा केला आहे.

एकदंरीत खाजगी इसम नामे 1) श्री.मनिष नरेंद्रराव श्रीखंडे, वय 29 वर्षे, व्यवसाय - शासकिय कंत्राटदार, रा. घर नं. 54 केदारेश्वर मंदीर रोड केदार चौक वरूड, जि. अमरावती यांनी मौजे ग्रामपंचायत हिंगणगाव येथील रस्ता तयार करण्याचे काम त्यांना मिळाले असुन त्यांनी रस्त्याचे काम इस्टीमेट मधील नियमाप्रमाणे न केल्याने तसेच निकृष्ठ दर्जाचे काम होत असल्यामुळे मी बांधकाम विभागाचे वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे तक्रारी केल्या त्या तक्रारी मागे घ्याव्या तसेच कामकाज पुर्ण झाल्यावर ग्रामपंचायत कडून देण्यात येणाऱ्या प्रमाणपत्रामध्ये अडचण निर्माण करू नये असे कायदेशीर कृत्य न करण्यासाठी ठेकेदार नामे श्री.मनिष श्रीखंडे यांनी मला लाच रक्कम म्हणुन 20,000/-रुपये देण्याचे आमिश दाखवून, प्रलोभन दिले

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** **(**केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.**)**

(1) **Registered the case and took up the investigation:**
(प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

**or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):
DHANJAY TULSHIRAM ZATALE
**Rank** (पद): HC (Head Constable) **No.**(क्र.): POBN65946
**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

or (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

**14 Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

**15.Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

[illegible]
६/3/2024

**Signature of Officer in-charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name (नाव):** Girish Gopalrao Tatl
**Rank(पद):** I (Inspector)
**No.(सं.):**

संतोष व टाकळे
पोलीस निरीक्षक